RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ९३(२)] मंगळवार, ऑगस्ट ३, २०२१/श्रावण १२, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २१२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ ऑगस्ट २०२१.

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेवानि-२०२०/प्र.क्र. ८२/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **" मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ "** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, " महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (सेवा प्रवेश) नियम, २०२१ " असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) " प्राधिकरण " म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ तसेच मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या पदावरील नियुक्ती, भारतीय प्रशासकीय सेवेतील कनिष्ठ प्रशासकीय श्रेणी (Junior Administrative Grade) दर्जाच्या किंवा समकक्ष पदावर व वेतनश्रेणीत कार्यरत अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीच्या धोरणानुसार प्रतिनियुक्तीने करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीनिवास मोकलीकर,**
शासनाचे अवर सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ ऑगस्ट २०२१.

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेवानि-२०२०/प्र.क्र. ८२/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या विविध मंडळातील (मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ आणि मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ वगळता) **" मुख्य अधिकारी "** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, " महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या विविध मंडळातील (मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ आणि मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ वगळता) मुख्य अधिकारी (सेवा प्रवेश) नियम, २०२१ " असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) " प्राधिकरण " म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) " विभाग " म्हणजे महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे.

(ड) " मुख्य अधिकारी " म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या विविध मंडळातील (मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ आणि मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ वगळता) मुख्य अधिकारी असा आहे.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "मुख्य अधिकारी" या पदावरील नियुक्ती शासनाच्या उप सचिव किंवा महसूल संवर्गातील अपर जिल्हाधिकारी किंवा अन्य प्रशासकीय विभागात समकक्ष पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार किंवा प्राधिकरणाच्या आस्थापनेमध्ये पदोन्नती मार्गाने सहमुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ / मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या पदावर कार्यरत असलेल्या व त्या पदावर किमान २ वर्षे नियमित सेवा झालेल्या अधिकाऱ्यांमधून बदलीने करण्यात येईल .

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर बदली / पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती, प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात / कार्यालयात बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीनिवास मोकलीकर,**
शासनाचे अवर सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ ऑगस्ट २०२१.

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेवानि-२०२०/प्र.क्र. ८२/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **" उप मुख्य कार्यकारी अधिकारी "** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील " उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (सेवा प्रवेश) नियम, २०२१ " असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) " प्राधिकरण " म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) " विभाग " म्हणजे महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील " उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण " या पदावरील नियुक्ती, शासनाच्या उप सचिव किंवा महसूल संवर्गातील अपर जिल्हाधिकारी किंवा अन्य प्रशासकीय विभागात समकक्ष पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार किंवा प्राधिकरणाच्या आस्थापनेवर सह मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ / मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीनिवास मोकलीकर,**
शासनाचे अवर सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ ऑगस्ट २०२१.

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेवानि-२०२०/प्र.क्र. ८२/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **" सचिव "** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील "सचिव, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (सेवा प्रवेश) नियम, २०२१" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) " प्राधिकरण " म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) " विभाग " म्हणजे महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील " सचिव, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण " या पदावरील नियुक्ती, शासनाच्या उप सचिव किंवा महसूल संवर्गातील अपर जिल्हाधिकारी किंवा अन्य प्रशासकीय विभागात समकक्ष पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीनिवास मोकलीकर,**
शासनाचे अवर सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ ऑगस्ट २०२१.

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेवानि-२०२०/प्र.क्र.८२/गृनिभू.— महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **" उप मुख्य अधिकारी (पणन), मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ "** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील "उप मुख्य अधिकारी (पणन), " मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (सेवा प्रवेश) नियम, २०२१" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) " प्राधिकरण " म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) " विभाग " म्हणजे महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "उप मुख्य अधिकारी (पणन), मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ" या पदावरील नियुक्ती, शासनाच्या अवर सचिव किंवा महाराष्ट्र राज्य महसूल संवर्गातील उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) किंवा सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील समकक्ष पदावर व वेतनश्रेणीवर कार्यरत असणा-या अधिकाऱ्यांमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीनिवास मोकलीकर,**
शासनाचे अवर सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.